पुरवठा आयुक्त कार्यालय
सतनाम मेन्शन इमारत, पहिला मजला,
जी.पी.ओ.कार्यालयाच्या बाजुला, पी.डिमेलो मार्ग, मुंबई-४००००१.
दुरध्वनी क्र. ०२२-२३७२१९१२,ई-मेल - supplycommissioneroffice@yahoo.com
सार्वजनिक वितरण व्यवस्था तक्रार निवारण प्रणाली हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:१८००-२२-४९५०

क्र. आस्था-४०२००९/प्र.क्र.४३९५/(भाग-२)वा.चा.नेमणुक/क-१ दिनांक - १४ जून,२०२४

## आमंत्रण पत्र

पुरवठा आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहन चालक पदावर बाहययंत्रणेद्वारे नियुक्ती करण्याबाबत अन्नं नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे क्र.आस्थाप्रं-१८१८/प्र.क्र.११०/ना.पु.१२, दि.२९/०८/२०१८ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे, त्यामुळे शासनाच्या प्रचलीत नियमानुसार कंत्राटी पध्दतीने वाहन चालकाची नियुक्ती करण्या करीता सोबतच्या प्रपत्र-अ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून खुल्या स्पर्धात्मंक निविदा मागविण्यात येत आहे.

खुल्या स्पर्धात्मंक निविदा मागवून L-१ नुसार ज्याचे कमीत कमी दर असतील अशा वाहन चालकाची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्या करीता खुल्या स्पंर्धात्मंक निविदा मा. उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय,मुंबई यांचे नावाने मोहरबंद पाकीटातून या कार्यालयाच्या पत्त्यावर टपालाने अथवा हस्तं बटवडयाने पाठविण्यात याव्यात.

(प.फ.गांगवे)
उप संचालक, नागरी पुरवठा,
महाराष्ट्र शासन

## प्रपत्र - अ

१) मोहोरबंद लिफाफयावर कंत्राटी पध्दतीने वाहनचालकाची नियुक्ती करण्यासाठी असे लिहीणे आवश्यक आहे.

२) निविदा दरपत्रक सादर करावयाचे ठिकाण- पुरवठा आयुक्तांचे कार्यालय
सतनाम मेन्शन इमारत, पहिला मजला,
जी.पी.ओ.कार्यालयाच्या बाजुला,
पी.डिमेलो मार्ग, मुंबई-४००००१.
दुरध्वनी क्र.०२२-२२६१४८७५
ई-मेल - supplycommissioneroffice@yahoo.com

३) प्राप्त निविदा दरपत्रक दिनांक ०१.०७.२०२४ रोजी दुपारी ठीक ३.३० वाजता पुरवठा आयुक्तांचे कार्यालय सतनाम मेन्शन इमारत, पहिला मजला, जी.पी.ओ.कार्यालयाच्या बाजूला, पी.डिमेलो मार्ग, मुंबई-४००००१ येथे प्राप्त होईल असे बघावे तसेच मोहोरबंद लिफाफे दि.०२.०७.२०२४ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता उघडण्यात येतील. सदर निविदा उघडतेवेळी पुरवठादार स्वत: किंवा त्यांचा प्रतिनीधी उपस्थित राहू शकतो.

४) सदर सेवा ही पूर्णपणे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असून नियुक्त वाहनचालकांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.

५) वाहनचालक किमान दहावी/बारावी इयत्ता उत्तीर्ण व भारतीय नागरीक असावा. तसेच वाहनचालकास मराठी लिहिता वाचता येणे आवश्यक राहील. तसेच हिंदी /इंग्रजीचे किमान ज्ञान असेल. शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्राच्या सत्यप्रती या कार्यालयास सादर करणे मक्तेदारावर बंधनकारक राहिल.

६) संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा त्या संदर्भात कंत्राट दिल्यानंतर संबंधित वाहनचालकाचे पोलीस तपासणी अहवाल देणे बंधनकारक राहील.

७) वाहनचालकाजवळ वाहन चालविण्याची वैध अनुज्ञप्ती असेल, त्याचे ओळखपत्र त्याच्याजवळ असेल.

८) वाहनचालकाने वर्दीवर असतांना नशापान/धुम्रपान व तंबाखुजनक पदार्थाचे सेवन करु नये.

९) वाहनास अपघात झाल्यास व दुर्दैवाने वाहनचालकास कोणत्याही स्वरुपाची वा गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्चाची अथवा नुकसान भरपाईची कोणतेही दायित्व या कार्यालय शासनावर राहणार नाही.

१०) कंपनी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या वाहनचालकांच्या सेवेचे कोणतेही उत्तर दायित्व या कार्यालय/शासनावर राहणार नाही.

११) वाहनचालकाचे वय ६० वर्षापेक्षा जास्त नसावे आणि १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

१२) उद्योग,,ऊर्जा व कामगार विभागाचा दि. २२.०२.२०१९ चा शासन निर्णय दि.२४.०७.२०१९ च्या शासन अधिसूचनेतील नमूद तरतुदीनूसार शासनाने निर्धारित केलेल्या वेतन दराप्रमाणे वेतन तसेच वेळोवेळी लागू असलेले कर व अनुज्ञेय भत्ते अदा करणे पुरवठादार संस्थेस बंधनकारक राहील. तसेच संस्थेकडून उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचा-यांचे कायदेशीर आर्थिक दायित्व, कर्मचा-याला देण्यात येणा-या वेतनात अंतर्भुत असेल. कायेदशीर आर्थिक दायित्वाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेकडे E.P.F. (Employment Provident Fund Organisation/G.I.S. (Geographic Information System)/E.S.I.C. (Employees State

Insurance Corporation) इ. जमा करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. मागणीनूसार याबाबतची कागदपत्रे वेळोवेळी पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांना उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थेची राहील.

१३) मागणी केलेल्या कालावधीसाठी वाहनचालक उपलब्ध होऊ शकत नसेल अशा वेळी पर्यायी व्यवस्था संस्था करेल अन्यथा दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल.

१४) मान्यवरांच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त वाहनचालकास काम करणे बंधनकारक राहील. वर्दी ९ तासांची राहील

१५) वाहनचालकास सर्व शासकीय सुट्ट्या अनुज्ञेय राहतील. तथापि जर आवश्यक असेल तर सुट्टीच्या दिवशीही वाहनचालकाच्या सेवा पुरवाव्या लागतील, सुट्टीच्या दिवशी काम केल्यास नियमानुसार वेतन देय असेल, कामाच्या दिवशी वाहनचालक गैरहजर राहिल्यास त्या दिवसाचे वेतन कपात केले जाईल.

१६) कराराचे पालन समाधानकारक न झाल्यास करार वेळेआधी केव्हाही संपुष्टात आणणे तसेच कराराची मुदत वाढविणे याबाबतचे निर्णय व अधिकार मा.सह सचिव तथा संचालक, ना.पु. यांची राहिल.

१७) कर्तव्यांवर असताना वाहन चालकाची वागणूक शिष्ट संमत असेल. उदा.वाहनचालकाने वाहतुकीचे नियम पाळणे, वागणुक सौजन्याचे ठेवणे, वाहनाजवळ चालकाने उपलब्ध असणे इत्यादी.

१८) वाहनचालकाकडे मोबाईल असावा तथापि वाहन चालविताना ते मोबाईलचा वापर करता येणार नाही.

१९) कार्यालयाची गोपनियता अबाधित राहिल याची दक्षता वाहनचालक व संस्था यांची राहील.

२०)कराराचा कालावधी हा ११ महिन्याकरिता राहील. त्यापुढे मुदतवाढ देणे अथवा कालावधी कमी करण्याचे अधिकार मा.सह सचिव तथा संचालक, ना.पु. यांचे राहतील.

२१).कार्यालयाच्या वाहनाची व वाहनातील ॲक्सेसरीजची काळजी/देखभाल करावी. त्यास नुकसान पोहचविल्यास संस्था जबाबदार राहिल.

२२).करारा संबंधी काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याचे कार्यक्षेत्र मुंबई राहिल.

२३)कोणत्याही कारणास्तव सदर करारामध्ये बदल करण्याचे तसेच करार संपुष्टात आणण्याचे अधिकार मा.सहसचिव तथा संचालक, ना.पु. यांचा राहिल.